मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या सेवा आता घरपोच!

## प्रशासनाचा निर्णय : पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना मिळणार लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरण, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र यासह विविध सेवांचा लाभ आता शहरातील नागरिकांना घरबसल्या घेता येणार आहे. यासाठी पिंपरी- चिंचवड महानगरपालिका, डिजीलॉकर, नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य, व आपले सरकार पोर्टल यांच्यातील आवश्यक असणारे डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाले आहे. यानिमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कागदविरहित आणि नागरिकांभिमूख प्रशासनाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे.




पिंपरी- चिंचवड महानगरपालिका आणि नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य यांच्यातील डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाल्यामुळे पिंपरी- चिंचवड शहरातील मालमत्ता हस्तांतरण ऑनलाइन पद्धतीने शक्य झाले आहे. मालमत्ता खरेदीदारांना आता मालमत्ता हस्तांतरणासाठी महानगरपालिकेत स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच नाव हस्तांतरणाची प्रक्रिया जलद झाली असून ती एका दिवसात पूर्ण होणार आहे. याशिवाय मालमत्तेच्या वापरातील निवासी ते व्यावसायिक अशा स्वरुपाचा कोणताही बदल महानगरपालिकेच्या रेकॉर्डमध्ये स्वयंचलितपणे अपडेट करणे शक्य होणार आहे.

**विवाह प्रमाणपत्र मिळणार एका क्लिकवर**

पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या विवाह नोंदणी प्रणाली डिजीलॉकरसोबत यशस्वीरित्या जोडण्यात आली आहे. त्यामुळे रहिवाशांना त्यांचे विवाह प्रमाणपत्रे ऑनलाइन उपलब्ध होणार आहे. पहिल्या टप्प्यात २०१४ पासून जारी करण्यात आलेले प्रमाणपत्रे आता डिजीटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

### आपले सरकार पोर्टलवर विविध सेवा

**» पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या काही सेवा प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्र सरकारच्या आपले सरकार पोर्टलवर देखील उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे नागरिकांना महानगरपालिका कार्यालयांना भेट न देत आवश्यक सेवांचा लाभ घेता येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने उद्योगधंदा परवाना, जलनिसरण जोडणी, अग्निशमन विभागाची एनओसी अशा सेवांचा समावेश आहे.**

“ पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेचे डिजीलॉकर, नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य, व आपले सरकार पोर्टल यांच्यातील आवश्यक असणारे डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाल्यामुळे आता नागरिकांना महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या सेवा अधिक सुलभपणे देणे शक्य होणार आहे. नागरिकांना जलद आणि अधिक कार्यक्षम प्रशासनाचा अनुभव देता यावा, यासाठी महानगरपालिकेने टाकलेले हा महत्त्वाचे पाऊल आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका**

---

# महानगरपालिकेतील भिंती सजल्या विद्यार्थ्यांच्या चित्रांनी

## अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्याकडून विद्यार्थ्यांसह शिक्षण विभागाचे कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत असणाऱ्या जिन्याच्या भिंती विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांनी सजल्या आहेत. महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी या चित्रांची पाहणी करीत विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे व असा अनोखा उपक्रम राबवल्याबद्दल शिक्षण विभागाचे कौतुक केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या सहकार्याने नुकतीच ‘कॅनव्हास ऑफ क्युरिऑसिटी’ हा चित्रकला मेळावा आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात आकांक्षा फौंडेशनच्या पाच शाळांसह महानगरपालिकेच्या ३४ शाळांनी सहभाग घेतला होता. चित्रकला मेळाव्यात २९० विद्यार्थ्यांनी ४० शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध चित्रांचे रेखाटन केले.

विद्यार्थ्यांना चित्र काढण्यासाठी विविध विषय तसेच चित्रकलेचे साहित्य देण्यात आले होते. यामध्ये



५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी ‘माझे गाव, माझे विश्व’, ‘विविधतेतील एकता’, ‘परंपरा आणि आधुनिकता’ यांसारख्या विषयांवर कल्पक चित्रे साकारली. यामधील उत्कृष्ट चित्र महानगरपालिकेच्या जिन्यातील भिंतीवर लावण्यात आली आहेत. या चित्राची पाहणी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी करीत विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतुक केले. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

“ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भिंतीवर लावण्यात आलेली विद्यार्थ्यांची चित्र ही विविध सामाजिक संदेश देणारी आहेत. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या चित्रांमध्ये त्यांच्यातील रंगसंगतीचे भान, विषयाचे सादरीकरण करण्याची कला, सर्जनशीलता दिसून येत असून शिक्षण विभागाचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

**- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गाला गती

## दोन स्थानके वाढविण्याबाबतचा प्रस्ताव जानेवारी महिनाअखेरीसच राज्य सरकारकडे पाठविला

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गिका प्रकल्पामध्ये बालाजीनगर (भारती विद्यापीठाजवळ) आणि सहकारनगर (बिबवेवाडी) ही दोन स्थानके वाढविण्याबाबतचा प्रस्ताव जानेवारी महिनाअखेरीसच राज्य सरकारकडे पाठविला आहे. या प्रस्तावाला तत्त्वत: मंजुरी प्राप्त होताच पुन्हा नव्याने निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (महामेट्रो) देण्यात आली. दरम्यान, संपूर्ण मेट्रो मार्गिका भुयारी असल्याने भूसंपादनाची आवश्यकता नसून, स्थानकांच्या जागेच्या भूसंपादनाबाबत कार्यवाही करण्यात येईल असेही, यावेळी मेट्रोतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट करण्यात आले.



'महामेट्रो'कडून स्वारगेट ते कात्रज असा ५.४६ किलोमीटरचा लांबीचा भुयारी मेट्रो मार्ग प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज अशी तीन मेट्रो स्थानके सुरुवातीला प्रस्तावित होती. मात्र, नागरिकांच्या सोयीसाठी लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून बालाजीनगर (भारती विद्यापीठ) या ठिकाणी मेट्रो स्थानक करावे, असा आग्रह धरण्यात आला होता. मेट्रोकडून पुन्हा तपासणी करून अहवालाद्वारे हे स्थानक वाढविण्यात आले. दरम्यान, बिबवेवाडी, सहकारनगर परिसरातील नागरिकांना आणखी एक स्थानक होऊ शकते, असे तपासणी अहवालात समोर आले. त्यामुळे हे स्थानकही आता होणार आहे. या दोन्ही स्थानकांमुळे प्रकल्पाची किंमत ६८३ कोटी रुपयांनी वाढणार आहे.

### वाढीव खर्च किती ?

- » जुन्या प्रस्तावानुसार येणारा खर्च – दोन हजार ९५४ कोटी रुपये
- » नवीन प्रस्तावानुसार येणारा खर्च – तीन हजार ६३७ कोटी रुपये
- » वाढलेला एकूण खर्च – ६८३ कोटी

**महापालिकेला खर्च उचलावा लागणार ?**

जुन्या कायद्यानुसार केंद्र सरकार १० टक्के, राज्य सरकार १५ टक्के आणि पुणे महापालिका १५ टक्के, असा ४० टक्के निधी आणि उर्वरित ६० टक्के निधी कर्जाच्या स्वरूपात उभा करणार आहेत. त्यानुसार पुणे महापालिकेला १५ टक्के रक्कम आणि भूसंपादनासाठी २४८.५२ कोटी रुपये इतका आर्थिक भार उचलावा लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. याचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे.

> स्वारगेट ते कात्रज भुयारी मेट्रो मार्गिका प्रकल्पामध्ये नव्याने दोन स्थानके वाढविण्याबाबत तपासणीनंतर राज्य सरकारकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविला आहे. लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता असून, नव्याने निविदा प्रक्रिया राबवून कामाला सुरुवात करण्यात येईल. प्रकल्पाची किंमत वाढणार असली, तरी नागरिकांसाठी हा निर्णय अत्यंत फायद्याचा ठरणार आहे.
>
> **- श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो.**

# शहरातील 58 खासगी आरओ प्रकल्पांवरील निर्बंध मागे

## प्रकल्प सुरु करण्यापूर्वी महापालिकेकडे नोंदणी करावी : 'आरओ' प्रकल्पांसाठी नियमावली जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराच्या काही भागांमध्ये गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) रुग्ण आढळून आल्याने पिण्याच्या शुद्ध पाण्याची गरज लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड महापालिकेने ५८ बंद आरओ प्रकल्प काही अटी-शर्तीवर चालू ठेवण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे, याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी स्वतंत्र आदेश दिले आहेत. त्यानुसार आरओ प्रकल्पचालकांना आता महापालिकेकडे रीतसर नोंदणी करावी लागणार असून बिगर घरगुती दराने मीटरनुसार पाण्याचे बिल भरावे लागणार आहे.



खासगी आरओ प्रकल्पांना नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह महापालिकेच्या संबंधित प्रभागातील कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांच्याकडे अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. खासगी आरओ प्रकल्प मालक किंवा चालक यांनी तातडीने त्यांच्या मूळ उत्पादक कंपनीकडून किंवा प्रकल्प दुरूस्त करणाऱ्या संस्थेकडून संपूर्ण 'आरओ' प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती करून घेणे, त्याबाबत प्रत्येक सहा महिन्यांनी दाखला संबंधित कंपनीकडून घेणे तसेच देखभाल दुरुस्तीचे प्रत्यक्ष काम सुरू असतानाचे सुस्पष्ट, तारीख, वेळ व जियो टॅगसह छायाचित्रे काढण्याच्या सूचना महापालिकेने दिल्या आहेत.

> महापालिकेच्या या निर्णयामुळे नागरिकांना शुद्ध व योग्य प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल. तरी, संबंधित आरओ प्रकल्पचालकांनी महापालिकेने दिलेल्या अटी-शर्ती आणि नियमांचे पालन करून अधिकृत परवानगी घेऊनच आरओ प्रकल्प सुरू ठेवावेत.
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

### आणखी काय आहेत अटी-शर्ती ?

- » मुख्य उत्पादक कंपनी किंवा प्रकल्प देखभाल-दुरुस्त करणाऱ्या संस्थेकडून प्रकल्पाच्या आउटलेटचे पाणी मानक आयएस आणि डब्लूएचओच्या मार्गदर्शक तत्वानुसार शुद्धीकरण करण्यासाठी प्रकल्प योग्य प्रकारे कार्यान्वित असल्याचा दाखला सादर करावा
- » राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका प्रयोगशाळेकडून वापरातील पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत दर महिन्याला स्रोत व शुद्ध केलेले पाणी यांची गुणवत्ता तपासणी करावी.
- » तपासणी अहवाल प्राप्त करून घ्यावा व तो प्रभागात सादर करावा.
- » महापालिकेचे पाणी वापर करत असल्यास नळजोड नियमान्वित करून बिगर घरगुती दराने मीटरनुसार त्या पाण्याचे बिल महापालिकेकडे भरावे.
- » अन्यथा नळजोड व आरओ प्रकल्प कायमस्वरूपी बंद केले जातील

# स्वच्छ, मुबलक पाण्यासाठी महापालिका देणार प्राधान्य; नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबवणार

**यंदाच्या अर्थसंकल्पात शहराचा पाणी पुरवठा सक्षमीकरणावर भर दिला आहे,त्यानूसार पवना धरणापासून निगडीतील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत थेट जलवाहिनी टाकण्यात येणार आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील विकासाचा वेग आणि भविष्यातील लोकसंख्या वाढ लक्षात घेता, शहरातील नागरिकांना स्वच्छ, व मुबलक पाणी देण्यासाठी महापालिकेने अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली आहे. विकसनशील भागातील पाणी पुरवठा सुधारण्यासाठी आणि पाण्याची वाढती मागणी पुर्ण करण्यासाठी पाण्याचे प्रलंबित प्रकल्प पुर्ण केले जाणार आहेत. स्वच्छ आणि मुबलक पाणीपुरवठ्याला प्राधान्य दिले असून, पवना धरण ते निगडीपर्यंत बंदिस्त जलवाहिनीसाठी ९५० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पुनरुज्जीवनाचे कामही सुरू करण्यात आले आहे.

महापालिकेच्या यंदाच्या अर्थसंकल्पात शहराचा पाणी पुरवठा सक्षमीकरणावर भर दिला आहेत. त्यानूसार पवना धरणापासून निगडीतील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत थेट जलवाहिनी टाकण्यात येणार आहेत. शहराच्या पाणी पुरवठा यंत्रणेवर उपकरणे आणि आटोमेशन, पाणी पुरवठा यंत्रणेवर स्वयंचलित नियंत्रण आणि निरीक्षण करण्यासाठी सध्याचा स्काडा प्रणालीसह रिमोट कंट्रोल करण्यात येणार आहे. याकरिता प्रकल्प राबवला जाणार आहे. तसेच नवीन पाण्याच्या टाक्या व मुख्य जलवाहिनी प्रकल्पात पाण्याच्या ३१ टाक्या बांधून ८३.५ एमएलडी साठवण क्षमता केली जाईल.

पिंपरी-चिंचवड शहराला पिण्याच्या पाण्यासाठी मावळातील पवना धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. पवना धरणातून नदीद्वारे पाणी सोडल्यानंतर ते रावेत बंधा-यातून उचलले जाते. धरणातून पालिका पाणी पुरवठा विभाग दररोज ५१० ते ५३० एमएलडी पाणी शहरासाठी घेण्यात येते. मात्र, शहराची लोकसंख्या सद्यस्थितीत सुमारे ३० लाखांच्या घरात असून हे पाणी शहराला दिवसाआड पुरेसे प्रमाणात द्यावे लागत आहेशहराची जीवनवाहिनी असलेली पवना नदी अतिप्रदूषित झाली आहे.




### तिन्ही नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी 2711 कोटींचा आराखडा

» शहरातून वाहणाऱ्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी २७११ कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार असून, यावर्षीच्या आर्थिक अंदाजपत्रकात इंद्रायणी नदीसाठी ११२.५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहेत. मुळा नदीसाठी पहिल्या टप्प्यातील वाकड ते सांगवी फाट्यापर्यंतच्या कामाला सुरुवात झाली आहे. पवना नदीसाठी राज्य आपत्ती निवारण निधीअंतर्गत राज्य सरकारकडून निधीची मागणी करण्यात आली आहे. मुळा, पवना व इंद्रायणी नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी राज्य व केंद्र सरकारकडून अनुदान मिळणार आहेत. केंद्र शासनाच्या अमृत २.० सरोवर योजनेअंतर्गत इंद्रायणीच्या प्रकल्पाला मान्यता मिळाल्याची माहिती आयुक्तांनी दिली.

### पिण्याच्या पाण्यासाठी 863 कोटी

» महापालिकेच्या वतीने निगडी ते दापोडीपर्यंत एक हजार मिलिमीटर व्यासाची मुख्य जलवाहिनी टाकण्यात येत आहे. त्यासाठी ५७.८१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पिण्याच्या पाण्याच्या अनधिकृत नळजोडण्या ओळखणे आणि प्रत्येक घराला मीटर जोडणे तसेच पाणीगळती रोखण्यासाठी ४६.९८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पम्पिंगचा दाब वाढवणे व विजेची बचत करण्यासाठी दुर्गादिवी टेकडीवर पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यासाठी १२७ कोटींचा निधी देण्यात येणार आहे. राज्य शासनाकडून महापालिकेला भामा-आसखेड धरणातून प्रतिदिन १६७ दशलक्ष लिटर पाण्याचा आरक्षण कोटा मंजूर केला आहे. याचा वापर करण्यासाठी एकूण ३६०.५५ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. नवीन ३१ पिण्याच्या पाण्याच्या टाक्या बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी २७२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

“ पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत नळजोडण्या ओळखून त्या प्रत्येक घराला स्मार्ट मीटरने पाणी जोडण्यात येणार आहे. याकरिता पाणी पुरवठा विभागाने ४६.९८ कोटींची तरतूद केली आहे. यामुळे जून्या अनधिकृत नळ जोडण्यामधून होणारी पाण्याची गळती कमी करण्यास मदत होईल. तसेच पाणी पट्टी महसूलात वाढ आणि थकीत पाणी कराची अपेक्षित वसूल होण्यास मदत होणार आहे. तर दुर्गादी टेकडीवर पाण्याची टाकी बांधण्यात येणार आहे. यास १२७ कोटी तरतूद केली आहे. यामुळे स्थानिक पंपिंग कमी करणे, पाण्याचा दाब वाढवणे, विजेची बचत होण्यास मदत होईल.

-शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# पवनाथडीत महिलांऐवजी पुरुषांचेच सक्षमीकरण

**पवनाथडी जत्रेतील निम्म्या स्टॉल्सचा महिलांऐवजी पुरुष मंडळींनीच ‘कब्जा’ घेतला असून महिला बचत गटांऐवजी त्यांचेच सक्षमीकरण होत आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवी सांगवी येथे आयोजित पवनाथडी जत्रेतील निम्म्या स्टॉल्सचा महिलांऐवजी पुरुष मंडळींनीच ‘कब्जा’ घेतला असून महिला बचत गटांऐवजी त्यांचेच सक्षमीकरण होत आहे. बचत गटांतील महिलांऐवजी त्यांच्या कुटुंबातील सदस्य स्टॉल्स चालवीत आहे. तर काही स्टॉल्सवर धंदेवाईक व्यापारी, व्यावसायिकांचीच घुसखोरी झाली काय ?, अशी शंका उपस्थित झाली आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे दिसून येत आहे.

नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून पवनाथडी जत्रा भरविण्यात आली आहे. महिलांनी स्वतः वस्तू, पदार्थांचे उत्पादन करावे तसेच प्रत्यक्षात विक्री कौशल्य शिकावे, यासाठी महापालिकेकडून हा उपक्रम राबवला जातो. त्याद्वारे महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवावे, असे प्रशासनाचे धोरण आहे. मात्र, पवनाथडी जत्रेचे नियोजन प्रमुख आणि महापालिकेचे उपायुक्त तानाजी नरळे यांच्यासमवेत पाहणी केल्यानंतर वरील धक्कादायक वास्तव समोर आले.



### तब्बल 36 स्टॉल्स रिकामे

» जत्रेच्या दुसऱ्या दिवशी ३६ पेक्षा अधिक स्टॉल्स रिकामे असल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. हे स्टॉल्स पूर्णपणे बंद होते किंवा त्यावर कोणतेही व्यवहार चालू नव्हते. त्यामुळे लॉटरी पद्धतीने ज्या बचत गटांना स्टॉल मिळाला त्यांना त्याची आवश्यकता नव्हती का ? किंवा गरज नव्हती; तर इतर बचत गटांना तो उपलब्ध करून का देण्यात आला नाही ? असा सवालही निर्माण होत आहे.

### पवनाथडीतील वास्तव...

- महिलांच्या संधींवर पुरुषांचा डल्ला
- बचत गटाच्या अध्यक्षांबाबत स्टॉलवरील व्यक्ती अनभिज्ञ
- योजना केवळ कागदोपत्री शिल्लक
- एकाच स्टॉलमध्ये दोन बचत गटांची व्यवस्था
- जागा अपुरी असल्याची अनेक बचत गटांची तक्रार
- पिण्याच्या पाण्याचा अभाव, सुरक्षा रक्षक, वैद्यकीय विभाग हैराण

“ पवनाथडी यात्रेची प्रत्यक्षदर्शी पाहणी केली. त्यातील उणीवा पुढील वर्षीच्या पवनाथडी जत्रेमध्ये दूर करण्यात येतील तसेच योग्य उपाय योजना राबवून पुढील वर्षी अधिकाधिक चांगल्या पद्धतीचे नियोजन करण्यात येईल. नागरिकांतूनही आलेल्या योग्य सूचनांचे स्वागत करून त्यानुसार आवश्यक बदल करण्यात येतील.

-तानाजी नरळे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# बालभारती पौड फाटा रस्ता सुसाट! नक्की काय घडले

## न्यायालयाने या रस्त्याच्या कामाला स्थगिती दिल्याने गेल्या दीड वर्षांपासून प्रक्रिया ठप्प झाली होती.

**पुणे | प्रतिनिधी**

बालभारती ते पौड फाटा या बहुचर्चित रस्त्याच्या कामाला विरोध करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याने या रस्त्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या रस्त्याला विरोध करणारी याचिका नागरी चेतना मंचाने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. न्यायालयाने या रस्त्याच्या कामाला स्थगिती दिल्याने गेल्या दीड वर्षापासून प्रक्रिया ठप्प झाली होती. हा रस्ता करताना महापालिकेने योग्य प्रक्रियेचा अवलंब केल्याचे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने ही याचिका फेटाळली.

पुणे महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये (डीपी) कोथरूड आणि सेनापती बापट रस्त्याला जोडण्यासाठी पर्यायी रस्ता म्हणून बालभारती ते पौड फाटा रस्ता दाखविण्यात आला आहे. हा रस्ता बालभारती, वेताळ टेकडी येथून सुरू होतो. विधी महाविद्यालयाच्या पाठीमागून हा रस्ता केळेवाडी येथील पौड फाट्याजवळ संपतो. या रस्त्यामुळे वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार असल्याने हा रस्ता तयार करण्याचे काम महापालिकेने सुरू केले होते. यासाठीचा प्रकल्प आराखडा तयार केला असून, त्यासाठी २५२ कोटी १३ लाख रुपये इतका खर्च होणार आहे.

दरम्यान, हा प्रस्तावित रस्ता झोपडपट्टीतून जाणार असल्याने या रस्त्याची जागा बदलावी लागली आहे. हा रस्ता आता सुमारे १२५ मीटर लांबून पौड फाट्याला जोडला जाणार आहे. हा बदल केल्याने प्रकल्प खर्च १७ कोटींनी वाढला आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च २५२ कोटी १३ लाखांपर्यंत गेला आहे. या कामासाठी सप्टेंबर २०२३ मध्ये निविदा प्रक्रिया सुरू केली जाणार होती, पण नागरिकांचा विरोध वाढल्याने हे काम थांबविण्यात आले होते.

महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे म्हणाले, हा रस्ता तयार करताना महापालिकेने सर्व अभ्यास केलेला आहे. न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे प्रकल्प मार्गी लागेल. आवश्यक त्या अटींची पूर्तता करून पुढील निर्णय घेतला जाईल.\

पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर म्हणाले, बालभारती-पौड फाटा रस्त्याच्या विरोधातील याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. हे काम करताना आवश्यक त्या परवानग्या घेऊन रस्ता करण्याची सूचना न्यायालयाने केली आहे. वरिष्ठांशी चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाईल.या रस्त्याच्या विकास आराखड्याबाबत हरकती-सूचना मागवून याचा समावेश डीपीत केला होता, अशी भूमिका महापालिकेने न्यायालयात मांडली, अशी माहिती विधी सल्लागार निशा चव्हाण यांनी दिली.



### पर्यावरणप्रेमींचे आक्षेप काय?

» 'हा रस्ता टेकडीवरून जाणार असल्याने येथील पर्यावरणाची हानी होणार आहे. या कामामुळे येथील पाण्याचे झरे आटतील, मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होणार, पुण्यातील टेकड्या, जैवविविधता नष्ट होणार आहे,' असा आरोप पर्यावरणप्रेमी आणि स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींकडून केला जात आहे. या रस्त्याच्या विरोधात नागरिकांनी मोर्चादेखील काढला होता.

### टेकडी वाचविण्यासाठी उन्नत मार्ग

» वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बालभारतीपासून वेताळ टेकडीवरून थेट पौड फाट्यापर्यंत रस्ता प्रस्तावित आहे. कर्वे रस्ता, पौड रस्ता, विधी महाविद्यालय रस्ता, तसेच सेनापती बापट रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हा रस्ता महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणार आहे. महापालिकेकडून या रस्त्याच्या कामासाठी सल्लागार नेमण्यात आला होता. त्यांच्याकडून या परिसराचा अभ्यास करून त्याचा अहवाल महापालिकेला सादर करण्यात आला. त्यामध्ये रस्त्याचा काही भाग जमिनीवरून, तर काही भाग हा उन्नतमार्ग असल्याचे नमूद आहे. या उन्नत मार्गामुळे टेकडी फोडावी लागणार नाही, असा महापालिकेचा दावा आहे.

### असा आहे रस्ता

» रस्त्याची एकूण लांबी : १.८ किलोमीटर
» उन्नत मार्ग : ४०० मीटर
» रस्त्याची रुंदी : ३० मीटर
» अंदाजे खर्च : २५२.१३ कोटी
» वाढीव खर्च : १७ कोटी

# सातत्याने दर ढासळत असल्याने दूध उत्पादक शेतकरी संकटात

## सातत्याने दुधाचे दर ढासळत असल्याने दूध उत्पादक अक्षरशः मेटाकुटीला आले असून व्यवसाय बंद करण्याची वेळ येते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

ग्रामीण भागात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून गाय आणि म्हशींच्या संगोपनातून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. हा व्यवसाय करत असताना शेतकरी संसाराला हातभार लावत आहेत; परंतु गेल्या काही महिन्यातील दुधाच्या दराची परिस्थिती पाहिली तर दुधाचा दर आणि उत्पादन खर्चाचा ताळमेळ बसविताना दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. सातत्याने दुधाचे दर ढासळत असल्याने दूध उत्पादक अक्षरशः मेटाकुटीला आले असून व्यवसाय बंद करण्याची वेळ येते की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

आंबेगाव तालुक्यात डिंभे धरणाची निर्मिती होऊन सुमारे 30 वर्षांचा कालखंड उलटला आहे. तालुक्यात मुबलक प्रमाणात पाणी असल्याने शेतकऱ्यांनी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय चालू केला. गेली तीन दशके तालुक्यात दुधाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावला आहे; परंतु सध्याच्या परिस्थितीत दुग्ध व्यवसाय करणे अत्यंत जिकिरीचे झाले असून दुधाचे दर ढासळत असल्याने आणि जनावरांचा दूध उत्पादनाचा खर्चही निघत नसल्याने व्यवसाय बंद करायची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शेतकरी हा शेती बरोबरच जोडधंदा म्हणून प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय करत आलेला आहे आणि दुग्ध व्यवसाय हाच शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा प्रमुख आधार बनलेला आहे. परंतु गेल्या काही महिन्यातील दुधाच्या दराची परिस्थिती पाहिली तर दूध दरात वाढ होण्याऐवजी कपातच होत असल्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचे चित्र दिसून येते.



> सध्या दूध उत्पादकांना एक लिटरला 20 ते 32 रुपये दर मिळत असला तरी शहरी भागात मात्र हेच दूध दुप्पट दराने विकले जात आहे. हा मोठा विरोधाभास असल्याचे प्रकर्षाने जाणवते. दुधाचे पडलेले दर आणि चारा तसेच पशुखाद्याचे वरचेवर वाढत जाणारे भाव यामुळे दूध उत्पादक शेतकरी गाय आणि म्हैस आदी जनावरे कमी करून इतर व्यवसायाकडे वळण्याच्या मार्गावर आहेत आणि त्यांनी घरगुती इतर व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला आहे.
> -कुंडलिक जाधव, दूध उत्पादक रांजणी

आता उन्हाळा सुरू झाला आहे आणि उन्हाळ्याच्या दिवसात चारा टंचाई जाणवत असतानाच अलीकडच्या काळात पशुखाद्याच्या किंमती भरमसाठ वाढल्याने दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. दरम्यान उन्हाळ्याच्या तोंडावर चारा टंचाई भेडसावणार असल्याने पशुपालक चिंतेत आहेत. त्यातच दुध उत्पादन खर्च पाहता दूध व्यवसायाचे गणित सातत्याने बिघडत चालले आहे. पशुखाद्याचे दर तर गगनाला भिडले असताना त्यामानाने दुधाला बाजार भाव चांगला मिळत नाही ही खरी शोकांतिका आहे. दुधाचा उत्पादन खर्च प्रति लिटर 35 ते 40 रुपये झाला आहे आणि दुधाला सरासरी दर मात्र 32 रुपये मिळत असल्याने दूध व्यवसाय शेतीपूरक व्यवसाय न राहता आतभट्ट्याचा खेळ झाला असल्याचे शेतकरी बांधव बोलून दाखवतात.